मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# 57 हजार विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराला 'अन्नामृत'चा बूस्टर!

## महापौर लांडगे यांच्या नेतृत्वाखाली ३०० शाळांचा पोषण आहार अधिक सक्षम

**» पिंपरी | प्रतिनिधी** **विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना केंद्रस्थानी ठेवून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि अन्नामृत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यात आलेल्या शालेय पोषण आहाराच्या केंद्रीय स्वयंपाकगृहाचे आज उद्घाटन करण्यात आले. या अद्ययावत सुविधेमुळे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३०० शाळांमधील तब्बल ५७ हजार विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी शालेय पोषण आहार व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.**




अन्नामृत फाउंडेशनच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना नियमितपणे शालेय पोषण आहार पुरविण्यात येतो. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि पोषणमूल्ये यांचा विचार करून केंद्रीय स्वयंपाकगृह आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अद्ययावत करण्यात आले आहे. आहार तयार करण्यापासून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये स्वच्छता व अन्नसुरक्षेच्या निकषांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला आहे.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, "विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षण यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्वच्छ, सकस आणि पौष्टिक आहार मिळणे हीदेखील आपली महत्त्वाची जबाबदारी आहे. पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ५७ हजार विद्यार्थ्यांना नियमितपणे पोषण आहार उपलब्ध करून दिला जात असून, या व्यवस्थेमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि गुणवत्तेचा उच्च दर्जा कायम राखणे आवश्यक आहे. आधुनिक पद्धतीने अद्ययावत करण्यात आलेले हे केंद्रीय स्वयंपाकगृह त्यादृष्टीने निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल."

महापौर लांडगे पुढे म्हणाले, "विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्येक घास हा सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण असावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी योग्य पोषण अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातही विद्यार्थीकेंद्री उपक्रमांना प्राधान्य देत महानगरपालिकेच्या माध्यमातून शैक्षणिक व पोषणविषयक सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाईल."

या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, इस्कॉनचे आध्यात्मिक गुरु गौरांग प्रभू, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार अमित गोरखे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, नगरसेविका सारिका मासुळकर यांच्यासह अन्नामृत फाउंडेशनचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहामुळे मोठ्या प्रमाणावर पोषण आहार तयार करण्याची क्षमता, स्वच्छता व अन्नसुरक्षेचे व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत गुणवत्तापूर्ण आहार पोहोचविण्याची प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. परिणामी, पिंपरी-चिंचवडमधील हजारो विद्यार्थ्यांच्या आरोग्यपूर्ण व उज्ज्वल भविष्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या सुविधेमुळे आणखी बळ मिळणार आहे.

### आमदार श्रीकांत भारतीय यांचे विशेष सहकार्य

या अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहासाठी आवश्यक जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तथा आमदार श्रीकांत भारतीय यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी आधुनिक व अधिक सक्षम व्यवस्था उभारण्यास मदत झाली. महानगरपालिका आणि अन्नामृत फाउंडेशन यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना दर्जेदार पोषण आहार उपलब्ध करून देण्याचे काम यापुढेही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

# शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील ७२ पानटपऱ्यांवर धडक कारवाई!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ आणि सिगारेटची विक्री करणाऱ्या पानटपऱ्यांवर पोलीस आणि महापालिकेने धडक कारवाई केली. मे ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत एकूण ७२ अवैध पानटपऱ्या निष्कासित करण्यात आल्या.**



पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आणि महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने शाळा-महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरातील अवैध पानटपऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मे ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत झालेल्या या धडक कारवाईत शहरातील एकूण ७२ पानटपऱ्या निष्कासित करण्यात आल्या. यामध्ये परिमंडळ-१ मधील १७, परिमंडळ-२ मधील १८, परिमंडळ-३ मधील २३ आणि परिमंडळ-४ मधील १४ पानटपऱ्यांचा समावेश आहे.

शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट आणि अन्य व्यसनाधीन करणाऱ्या पदार्थांची विक्री होऊ नये, यासाठी ही कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांना लहान वयात व्यसनांच्या आहारी जाण्यापासून रोखणे, त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे तसेच शैक्षणिक परिसर सुरक्षित व स्वच्छ ठेवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. पोलीस आणि महापालिकेच्या संयुक्त कारवाईमुळे शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील अनधिकृत व्यवसायांवर मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात यापुढेही सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात अशा प्रकारची विक्री करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. तसेच नागरिकांनी अशा प्रकारची अवैध विक्री आढळल्यास पोलीस किंवा महापालिका प्रशासनाला माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेश विसर्जनासाठी 'अलर्ट'; घाटांवर महापौरांची धडक पाहणी!

## स्वच्छता, सुरक्षा आणि सुविधांमध्ये हलगर्जीपणा नको; रवि लांडगे यांचे कडक निर्देश



**पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर करण्यात आलेल्या स्वच्छता, सुरक्षा आणि नागरिकांसाठीच्या सुविधांची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक सुविधा वेळेत पूर्ण करून मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**

महापौर रवि लांडगे म्हणाले, "गणेशोत्सव हा श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. गणेश विसर्जनाची प्रक्रिया सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडणे आवश्यक आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुरक्षित व सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे." विसर्जन घाटांवरील स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, निर्माल्य संकलन, दिशादर्शक फलक, कृत्रिम विसर्जन हौद आणि सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विसर्जन घाटांवर भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रवेश व बाहेर पडण्याचे मार्ग सुकर ठेवावेत. घाट परिसरात चिखल, घसरडेपणा अथवा पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. घाट परिसरातील स्वच्छता सातत्याने राखण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करावे, अशा सूचनाही महापौरांनी दिल्या.

निर्माल्य नदीपात्रात किंवा जलस्रोतांमध्ये जाणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देताना निर्माल्यकुंडांची योग्य ठिकाणी व्यवस्था करून त्याबाबत स्पष्ट दिशादर्शक फलक लावावेत, असे त्यांनी सांगितले. विसर्जनस्थळी निर्माण होणारा कचरा तातडीने संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. नागरिकांनीही निर्माल्य व इतर पूजासाहित्य जलस्रोतांमध्ये न टाकता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या व्यवस्थेचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

लहान गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन हौदांमध्येच करावे. शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे विसर्जन शक्यतो घरीच स्वच्छ पाण्यात करावे. नदी, नाले आणि इतर जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा आणि 'स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवड' घडविण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

विसर्जन घाटांवरील सुरक्षा व्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड न करण्याच्या सूचना देताना आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवावी, जीवनरक्षकांची नियुक्ती करावी, अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन पथके सज्ज ठेवावीत आणि मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी सातत्यपूर्ण समन्वय राखावा, असे त्यांनी निर्देशित केले. भाविकांना विसर्जन प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी दिशादर्शक व स्थलदर्शक फलक ठळकपणे लावावेत, असेही त्यांनी सांगितले.

विसर्जनाच्या दिवशी वाढणारी गर्दी लक्षात घेता प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील विसर्जनस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध असल्याची खात्री करावी. घाट परिसर, विसर्जन मार्ग आणि परिसरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता सातत्याने राखावी. भाविकांना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्याची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत विसर्जनाची संपूर्ण व्यवस्था सुरळीत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडावी, असे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

### विसर्जन घाट पाहणीत पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित

अहिल्यादेवी होळकर घाट व वेताळ महाराज घाट परिसराच्या पाहणीदरम्यान 'ह' क्षेत्रीय प्रभाग अध्यक्षा तथा नगरसदस्या तृप्ती कांबळे उपस्थित होत्या.

वाकड घाट परिसरात 'ज' क्षेत्रीय प्रभाग अध्यक्षा तथा नगरसदस्या आरती चोंधे, नगरसदस्या रेश्मा भुजबळ, नगरसदस्य राहुल कलाटे, माजी नगरसदस्य राम वाकडकर उपस्थित होते.

चिंचवड येथील थेरगाव पूल घाट परिसरात विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे, 'ब' क्षेत्रीय प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, शेखर अण्णा चिंचवडे, सुरेश भोईर आदी उपस्थित होते.

जाधववाडी घाट, रावेत परिसराच्या पाहणीदरम्यान नगरसदस्या ऐश्वर्या तरस, नगरसदस्य राजेंद्र तरस आदी उपस्थित होते.

# शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर महापालिकेचा धडाका!



**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महानगर पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि अतिक्रमण मुख्य कार्यालय उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व १० क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या या कारवाईत एकत्रितपणे सुमारे ८३ हजार ९९ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.**

महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये आर.सी.सी. स्वरूपाची अनधिकृत बांधकामे, अनधिकृत पत्राशेड, नव्याने सुरू असलेली बांधकामे तसेच पदपथावरील अनधिकृत टपऱ्या, हातगाडे आणि इतर अतिक्रमणांचा समावेश आहे.

अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील साईनगर, निगडी परिसरात अंदाजे ३ हजार ४९८ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील शगुन चौक, पिंपरी मार्केट, एम्पायर ब्रिजखाली चिंचवड आणि वाल्हेकरवाडी परिसरात १० हजार ५३८ चौरस फूट क्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. क क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत चिखली, कुदळवाडी, शिवरोड, रवी रंजन वजन काटा चिखली आणि डी-मार्ट शेजारी चिंचवड परिसरात १२ हजार ७२३ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली.

ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ५ हजार ४०० चौरस फूट, तर ई क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी व मोशी परिसरात ७ हजार ९६५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या मोरे वस्ती, चिखली, तळवडे आणि नेवाळे वस्ती परिसरात सर्वाधिक १९ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

ग क्षेत्रीय कार्यालयाच्या राजवाडे नगर, गोकुळवाडी, पवनानगर, स्वप्ननगरी कॉलनी, काळेवाडी, डोंगरे कॉर्नर, मंगल नगर आणि थेरगाव परिसरात १३ हजार ३५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ह क्षेत्रीय कार्यालयाच्या जुनी सांगवी परिसरात १ हजार ८६ चौरस फूट, ज क्षेत्रीय कार्यालयाच्या वाल्हेकरवाडी, दत्त मंदिर रोड वाकड, पिंपळे निलख व किवळे परिसरात ६ हजार २८ चौरस फूट, तर ल क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी, इंद्रायणी नगर, संत तुकाराम नगर आणि पिंपरी परिसरात ३ हजार ४२६ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली.

सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली झालेल्या या कारवाईत उपअभियंते, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, बीट निरीक्षक, २१८ एम.एस.एफ. जवान, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महापालिका मजूर यांनी सहभाग घेतला.

शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी तसेच अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून यापुढेही आवश्यकतेनुसार नियमित कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

> "पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवणे तसेच अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करणे ही महापालिका प्रशासनाची सातत्यपूर्ण जबाबदारी आहे. नागरिकांनी अनधिकृत बांधकामे अथवा अतिक्रमणे करू नयेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. शहराचे नियोजनबद्ध व शिस्तबद्ध स्वरूप कायम ठेवण्यासाठी यापुढेही क्षेत्रनिहाय नियमित कारवाई सुरू राहणार आहे."
>
> –डॉ. विजय सूर्यवंशी, युक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# चिमुरड्या असुरक्षित; अत्याचार प्रकरणे फास्ट ट्रॅकवर घ्या!

## टाकवे बुद्रुक अत्याचार प्रकरण फास्ट ट्रॅकवर घ्या; तृप्ती देसाईंची मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ तालुक्यात चिमुरड्या आणि अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, पुणे ग्रामीण भागात मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असल्याचा थेट आरोप भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी केला आहे. टाकवे बुद्रुक येथे अवघ्या पावणेतीन वर्षांच्या बालिकेवर ५१ वर्षीय नराधमाने केलेला अत्याचार अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारा आहे. ही विकृती मुळासकट ठेचून काढण्याची वेळ आता आली असून, या प्रकरणाचा तपास तातडीने पूर्ण करून हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा तसेच पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.**

टाकवे बुद्रुकमधील या घृणास्पद घटनेनंतर संपूर्ण गाव बंद ठेवून स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले होते, यावरून जनतेतील संताप स्पष्टपणे दिसून येतो. लहान मुले घरात, अंगणात अथवा ओळखीच्या व्यक्तींसोबतही सुरक्षित नसतील, तर ग्रामीण भागातील हे दहशतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण वेळीच रोखले पाहिजे. मावळ तालुक्यात वारंवार अशा घटना का घडत आहेत, याचे आत्मपरीक्षण केवळ पोलीस प्रशासनानेच नव्हे, तर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि राजकीय नेत्यांनीही करण्याची गरज आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांत उर्से येथे अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती, त्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेळगी गावातही अशाच विकृतीतून अल्पवयीन मुलगी पीडित झाली आणि आता टाकवे बुद्रुकमध्ये ही संतापजनक घटना घडली आहे. एकाच तालुक्यात सलग अशा घटना घडणे हे पोलिसांचा गुन्हेगारांवरील वचक संपुष्टात आल्याचे द्योतक असल्याचा घणाघातही देसाई यांनी केला.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नसरापूर येथील गुन्ह्याचा तपास वेगाने करून अवघ्या दोन महिन्यांत निकाल आणि आरोपीला शिक्षा होऊ शकते, मग तसाच वेग मावळ तालुक्यातील प्रकरणांच्या तपासात का दाखवला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनाकडून गुन्ह्यांमध्ये भेदभाव होता कामा नये. प्रत्येक अशा प्रकरणात जर दोन ते तीन महिन्यांत दोषारोपपत्र दाखल करून कठोर शिक्षा झाली, तरच गुन्हेगारांवर कायद्याचा धाक निर्माण होईल. काही प्रकरणांमध्ये पीडित मुली या परप्रांतीय किंवा आदिवासी समाजातील असल्याचे पुढे आले. अत्याचारासारख्या विकृतीला कोणतीही जात, धर्म किंवा प्रांत नसतो. महाराष्ट्रात बाहेरून आलेल्या किंवा मागास घटकातील मुलींना सहज टार्गेट केले जात असेल, तर अशा दुर्बल घटकांच्या रक्षणासाठी पोलीस प्रशासनाने अधिक सजग आणि बारकाईने काम करणे कर्तव्य आहे. गुन्हेगारांची ही विकृती ठेचण्यासाठी पोलिसांनी निष्क्रिय न राहता आक्रमकपणे कायदेशीर पावले उचलावीत आणि उद्या कोणत्याही लेकीवर असा प्रसंग ओढवू नये यासाठी संपूर्ण मावळवासीयांनीही आता संघटितपणे रस्त्यावर उतरून आवाज उठवला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# राष्ट्रीय साखर पुरस्कारांत महाराष्ट्राचा दबदबा; ५७ पैकी तब्बल २१ पुरस्कार!



**पिंपरी | प्रतिनिधी**

**राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघातर्फे गाळप हंगाम २०२४-२५ आणि २०२५-२६ साठी जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्षमता पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी दमदार कामगिरी केली आहे. दोन्ही वर्षांतील एकूण ५७ पुरस्कारांपैकी तब्बल २१ पुरस्कार महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी पटकावले असून, राज्याने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आहे. या पुरस्कारांचे वितरण २२ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडणार असून, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह विविध राज्यांतील मंत्री, साखर कारखान्यांचे संचालक, वरिष्ठ अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.**

सहकारी साखर उद्योगातील गुणवत्ता, कार्यक्षमता, आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक व्यवस्थापन आणि सामाजिक बांधिलकीला प्रोत्साहन देण्यासाठी महासंघातर्फे दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राने विविध विभागांत उल्लेखनीय यश मिळवत देशातील सहकारी साखर उद्योगात आपला दबदबा कायम ठेवला आहे.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये तांत्रिक कार्यक्षमतेच्या उच्च उतारा विभागात पुणे जिल्ह्यातील नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याने प्रथम, तुळजापूर येथील विलास सहकारी साखर कारखान्याने द्वितीय, तर पुण्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याने तृतीय क्रमांक पटकावला. सर्वोच्च साखर उतारा पुरस्कार साताऱ्यातील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याला मिळाला आहे. संस्थात्मक सामाजिक दायित्व विभागात सांगलीच्या राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याची निवड झाली असून, सर्वोत्तम सहकारी साखर कारखान्याचा पुरस्कार सोलापूरच्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याला मिळाला आहे. तसेच २०२५-२६ चा वसंतदादा पाटील पुरस्कार सांगलीतील डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याला जाहीर झाला आहे.

गाळप हंगाम २०२४-२५ मध्येही महाराष्ट्राने दमदार कामगिरी केली. उच्च उतारा विभागात कोल्हापूरचा श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रथम, जालन्यातील कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना द्वितीय, तर साताऱ्यातील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याला तृतीय पुरस्कार मिळाला. तांत्रिक कार्यक्षमतेच्या विभागात साताऱ्यातील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना प्रथम, सांगलीतील डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना द्वितीय, तर पुण्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखाना तृतीय ठरला.

आर्थिक व्यवस्थापन विभागात सोलापूरच्या विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याला तृतीय पुरस्कार मिळाला. सर्वोच्च साखर उतारा पुरस्कार कोल्हापूरच्या भोगावती सहकारी साखर कारखान्याला, तर संस्थात्मक सामाजिक दायित्व पुरस्कार कोल्हापूरच्या अशोक सहकारी साखर कारखान्याला मिळाला आहे. सर्वोत्तम सहकारी साखर कारखान्याचा पुरस्कार कागल, कोल्हापूर येथील श्री छत्रपती शाहू सहकारी कारखान्याला मिळाला. वसंतदादा पाटील पुरस्कार पुण्याच्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला, तर जीवनगौरव पुरस्कार कोल्हापूरच्या कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याला जाहीर करण्यात आला आहे.

एकूण ५७ राष्ट्रीय पुरस्कारांपैकी २१ पुरस्कार महाराष्ट्राने मिळवणे ही राज्याच्या सहकारी साखर उद्योगाच्या कार्यक्षमतेची आणि गुणवत्तेची मोठी पावती मानली जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

# पुणे रेल्वे स्थानकावर 9 तासांचा ब्लॉक; 7 गाड्या रद्द!

## पुणे-मुंबई एक्स्प्रेससह लोकल, डेमूवर परिणाम; गाड्यांचे थांबे आणि स्थानक बदलले

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे रेल्वे स्थानक परिसरातील पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्यासाठी मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून रविवारी (१३ सप्टेंबर) सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत तब्बल नऊ तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत रेल्वे मार्ग आणि स्थानक परिसरातील आवश्यक कामे करण्यात येणार असल्याने रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम होणार आहे. या विशेष ब्लॉकमुळे पुणे-मुंबई एक्स्प्रेससह एकूण सात गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर काही गाड्यांचे थांबे आणि सुटण्याचे स्थानक बदलण्यात आले आहे. त्यामुळे रविवारी पुणे स्थानकावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना या बदलांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.**




या ब्लॉकच्या पार्श्वभूमीवर पुणे–तळेगाव आणि तळेगाव–पुणे लोकल, पुणे–लोणावळा आणि लोणावळा–शिवाजीनगर लोकल, सीएसएमटी मुंबई–पुणे एक्स्प्रेस, पुणे–सीएसएमटी मुंबई एक्स्प्रेस तसेच पुणे–दौंड डेमू या सात गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पुणे शहरासह उपनगर आणि परिसरातून लोकलने नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. विशेषतः रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने पुणे स्थानकावर प्रवाशांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन आधीच करणे आवश्यक आहे.

दरम्यान, पुण्याकडे येणाऱ्या काही लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या थांब्यांमध्येही बदल करण्यात आला आहे. जयपूर–पुणे एक्स्प्रेस आणि सीएसएमटी–पुणे एक्स्प्रेसला पुणे स्थानकाऐवजी खडकी स्थानकावर थांबा देण्यात येणार आहे. नागपूर–पुणे, अमरावती–पुणे आणि जम्मू तवी–पुणे एक्स्प्रेस या गाड्यांना हडपसर स्थानकावर थांबा देण्यात येणार आहे. तसेच लोणावळा–पुणे लोकल शिवाजीनगर स्थानकापर्यंतच धावणार असून, बारामती–पुणे डेमूची सेवा पुण्याऐवजी दौंड स्थानकापर्यंत मर्यादित करण्यात आली आहे.

पुण्याहून सुटणाऱ्या काही गाड्यांच्या वेळा आणि स्थानकांमध्येही बदल करण्यात आले आहेत. पुणे–लोणावळा लोकल पुणे स्थानकाऐवजी शिवाजीनगर स्थानकातून सुटणार आहे. पुणे–जयपूर एक्स्प्रेस सायंकाळी ५ वाजून ३५ मिनिटांनी खडकी स्थानकातून रवाना होईल. पुणे–नागपूर एक्स्प्रेस सायंकाळी ५ वाजून ४५ मिनिटांनी हडपसर स्थानकातून सुटणार आहे. तर पुणे–सीएसएमटी एक्स्प्रेस सायंकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी खडकी स्थानकातून रवाना होणार आहे. त्यामुळे संबंधित गाड्यांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी नेहमीच्या पुणे स्थानकावर न जाता बदललेल्या स्थानकावरून गाडी पकडण्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

विशेष ब्लॉकच्या कालावधीत रेल्वे वाहतुकीत होणारे बदल लक्षात घेता प्रवाशांनी रविवारी प्रवासाचे नियोजन करताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे. प्रवासापूर्वी संबंधित गाडीची अद्ययावत स्थिती, वेळ आणि सुटण्याचे स्थानक तपासणे महत्त्वाचे आहे. प्रवाशांनी INDIAN RAILWAYS ENQUIRY संकेतस्थळ किंवा NTES ॲपवर गाडीची ताजी माहिती तपासूनच प्रवास करावा, असे मध्य रेल्वेने स्पष्ट केले आहे.

# दगडूशेठ गणपतीसमोर यंदा 'प्रेम मंदिरा'चा भव्य दरबार!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने यंदा भक्तांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणारी भव्य सजावट साकारण्यात आली आहे. वृंदावन येथील प्रसिद्ध 'प्रेम मंदिर'ची भव्य प्रतिकृती गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणार असून, 'भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते' या संकल्पनेवर आधारित या मंदिराची रचना करण्यात आली आहे. तब्बल १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असलेल्या या प्रतिकृतीमुळे गणेशोत्सवाच्या वैभवात आणखी भर पडणार आहे.**





सोमवारी (१४ सप्टेंबर) सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी उत्तर प्रदेशातील श्री राधावल्लभ मंदिराचे तिलकायत अधिकारी श्रीहित मोहितमराल गोस्वामी महाराज यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यापूर्वी सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून आकर्षक फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून गणरायाची आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. प्राणप्रतिष्ठापनेनंतर दुपारी १२ वाजल्यापासून भाविकांना श्रीमंत दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेता येणार आहे.

याच दिवशी सायंकाळी सात वाजता राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंदिरावरील विद्युत रोषणाईचे उद्घाटन होणार आहे. या प्रतिकृतीमध्ये संगमरवरी वास्तुकलेपासून प्रेरित भव्य दर्शनी भाग, उत्तर भारतीय मंदिराच्या पारंपरिक रचनेची झलक देणारे कलाकुसरयुक्त स्तंभ व घुमट साकारण्यात आले आहेत. तसेच कृष्णलीला दर्शविणारे शिल्पपट आणि दर्शनी भागावर राधा-कृष्णाची भव्य मूर्ती उभारण्यात आली आहे.

भाविकांचे स्वागत करण्यासाठी बुधवार चौकामध्ये भव्य कमान उभारण्यात येणार असून, दोन्ही बाजूंच्या मांडवांवर कृष्णलीलेतील विविध प्रसंग साकारण्यात आले आहेत. कलादिग्दर्शक नीतेश कुमार आणि ग्लिटरी इव्हेंट्स कंपनीने ही आकर्षक मंदिर प्रतिकृती साकारली आहे. त्यामुळे गणेशोत्सवात पुण्यात येणाऱ्या भाविकांसाठी ही सजावट विशेष आकर्षण ठरणार आहे.

गणेशोत्सवाच्या काळात भाविकांच्या सुरक्षिततेलाही ट्रस्टकडून प्राधान्य देण्यात आले आहे. संपूर्ण परिसरावर तब्बल १५० कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात येणार असून, पोलीस यंत्रणेबरोबरच ट्रस्टचे सुमारे २५० सुरक्षारक्षक बंदोबस्तासाठी तैनात राहणार आहेत. गर्दीचे नियोजन, भाविकांची सुरक्षितता आणि दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

यामुळे यंदाचा गणेशोत्सव केवळ भव्य सजावट आणि धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता, भाविकांची सुरक्षितता आणि सुविधांचा विचार करणारा ठरणार आहे. वृंदावनच्या 'प्रेम मंदिर'ची भव्य प्रतिकृती आणि दगडूशेठ गणपतीचे आकर्षक रूप पाहण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक पुण्यात दाखल होण्याची शक्यता आहे.

### गणेशभक्तांसाठी ५० कोटींचे विमा कवच

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील गणेशभक्तांसाठी ट्रस्टच्या वतीने तब्बल ५० कोटी रुपयांचा विमा काढण्यात आला आहे. चेंगराचेंगरी, दहशतवादी हल्ला किंवा हवाई हल्ल्यासारख्या दुर्घटनांच्या परिस्थितीत भाविकांना या विम्याचे सुरक्षाकवच मिळणार आहे. अपघाती मृत्यू झाल्यास प्रति व्यक्ती ५ लाख रुपये, अपंगत्व आल्यास २ लाख रुपये, तर जखमी झालेल्या भाविकांना औषधोपचारासाठी ५० हजार रुपयांपर्यंतची मदत मिळणार आहे.